**कृपया प्रसिध्दीसाठी -** **6 जुलै 2009**

## मध्यमवर्गीय आम आदमीसाठी निराशाजनक अर्थसंकल्प : राम नाईक

**मुंबई, सोमवार** : "वाढत्या महागाईचा विचार करता आयकरात नगण्य सवलत असल्याने 'मध्यमवर्गीय आम आदमीच्या' दृष्टीने अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांचा अर्थसंकल्प निराशाजनक आहे," अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी व्यक्त केली आहे. "महागाई कमी करण्यासाठी कोणतीही ठोस पावले अर्थसंकल्पात जाहीर झालेली नाहीत. एवढेच नव्हे तर, गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) दोन आकडी करण्याचा निर्धार सरकारने व्यक्त केला होता, तर आता अर्थमंत्री आगामी पाच वर्षे जीडीपी 9 टक्क्यांवर ठेवण्याचा प्रयत्न राहील असे म्हणतात. या सरकारकडे विकास करण्यासाठी लागणारी प्रबळ इच्छाशक्तिच नाही हेच यावरुन स्पष्ट होते," अशी टीकाही श्री.नाईक यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**